महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ, जि. ठाणे - ४२१ ५०१.
**Government Medical College, Ambernath, Dist. Thane - 421 501.**
Email Id :- deangmcambernath@gmail.com
अधिष्ठाता कार्यालयाचा पत्ता (तात्पुरता) :- १ ला मजला, प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, नवीन प्रशासकीय भवन, नगर परिषद, अंबरनाथ (प.). ४२१ ५०१.

जा.क्र.शावैमअं/कंत्राटी भरती जाहिरात/120 दिवस/111/2024, दि.11/07/2024

# जाहिरात

## (WALK-IN INTERVIEW)

**विषय** - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ येथे कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या पदांची जाहिरात प्रकाशित करण्याबाबत...

**संदर्भ-**

1. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमईडी-2022/प्र.क्र.229/22/शिक्षण-1, दि.14.07.2023.
2. The Gazette of India, CG-DL-E-17082023-248154 EXTRAORDINARY PART-III SECTION 4 NMC, NEW DELHI, DT: 16/08/2023 (MSR).

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंबरनाथ येथे खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरिता चिकित्सालयीन (364 दिवसांकरिता) व अचिकित्सालयीन (120 दिवसांकरिता) या विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पद्धतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच वयाच्या 69 वर्षे वयोगटाचे आतील राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी व अन्य क्षेत्रातील उमेदवारांना करार पद्धतीने नियुक्ती देण्यासाठी खालील प्रमाणे जाहिरात देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्तपदे | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मानधन प्रति महिना | मुलाखत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्राध्यापक | 17 | एनएमसी, नवी दिल्ली यांचे मानकानुसार | 1) 1,85,000/- (बिगर सेवानिवृत्त)<br>2) (शा. नि. 17.12.2016 तरतुदीनुसार (सेवानिवृत्त)) | 16/07/2024 |
| 2 | सहयोगी प्राध्यापक | 27 | एनएमसी, नवी दिल्ली यांचे मानकानुसार | 1) 1,70,000/- (बिगर सेवानिवृत्त)<br>2) (शा. नि. 17.12.2016 तरतुदीनुसार (सेवानिवृत्त)) | 16/07/2024 |
| | **एकूण** | **44** | | | |

1. **<u>अर्ज मिळण्याचे ठिकाण :-</u>**
   मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ यांचे कार्यालय , 1 ला मजला, नगरपरिषद अंबरनाथ इमारत, कै. बी.जी छाया उपजिल्हा रुग्णालय अंबरनाथ जवळ, अंबरनाथ, जि. ठाणे.

2. **<u>अर्ज स्वीकारणाचा कालावधी :-</u>**
   दि.12.07.2024 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून ते दि.15.07.2024 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत.
3. **<u>अर्ज स्वीकारणाची अंतिम तारीख :-</u>**
   दि.15.07.2024 रोजी सायंकाळी 5.00 पर्यंत.
4. **<u>मुलाखत दिनांक :-</u>**

1. मुलाखत दि.16/07/2024 रोजी सकाळी 11 वाजता, मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ यांचे दालनात घेण्यात येईल. (कार्यालयीन पत्ता- मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ यांचे कार्यालय, 1 ला मजला, नगरपरिषद अंबरनाथ इमारत, कै. बी.जी छाया उपजिल्हा रुग्णालय अंबरनाथ जवळ, अंबरनाथ, जि. ठाणे.)
2. मुलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठवले जाणार नाही.
3. मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे (Original Documents) सादर करणे आवश्यक आहे.
4. मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल त्याकरिता कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

5. **महत्वाची टीप :-**
   1. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
   2. उमेदवाराचे वय नियुक्ती वेळेस कमाल 69 वर्षापेक्षा जास्त नसावे.
   3. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पद्धतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेने विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.
6. **गुणांकन पद्धत :-**

   जाहिराती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आलेली आहे.
   1. परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्यानुसार अनुक्रमांक 1 ते 4 वरील एकूण 85 गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करून त्यानुसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.
   2. प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती 100 गुणांपैकी किमान 41 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच करार तत्त्वावरील नियुक्तीकरिता विचार केला जाईल.
7. **नियम व अटी :-**
   1. करार पद्धतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा 364 दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील तथापि सदरहू पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करून देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.
   2. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास गंभीर स्वरूपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.
   3. करार पद्धतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकानुसार अध्यापन रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.
   4. वरील प्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.
   5. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.
   6. करार पद्धतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तिक रजा अनुज्ञेय असतील.
   7. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे किंवा माहिती आधारसामग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
   8. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.
   9. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथ पत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थी हित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.
   10. बिगर सेवानिवृत्त गटातून करार पद्धतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.
   11. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरिक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.
   12. सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे किंवा सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता स्वतःकडे राखून ठेवला आहे.
   13. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग यांना राहतील.

14. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

15. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम 1965 च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

16. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळ्याने कळविण्यात येईल.)

17. मुलाखतीला येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मूळ कागदपत्र सोबत आणणे बंधनकारक राहील.

8. **<u>शैक्षणिक पात्रता :-</u>**

1. महाराष्ट्र आयुर्विज्ञान परिषद व भारतीय आयुर्विज्ञान परिषद नवी दिल्ली यांच्या मानकानुसार अर्हता प्राप्त.
2. महाराष्ट्र मेडिकल कौंसिल यांच्याकडील वैधताप्राप्त नोंदणी (Valid MMC Registration) असणे आवश्यक.

9. **<u>टीप :-</u>**

**सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.**

**(डॉ. संतोष जी. वर्मा)**
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अंबरनाथ, जि. ठाणे.

**<u>प्रति -</u>**

1. कार्यालयीन संकेतस्थळ, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
2. सूचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ.

**<u>प्रत माहितीस्तव -</u>**

1. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, मुंबई.
2. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
3. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य याना सूचना फलकावर लावण्याकरिता सस्नेह सादर.

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | | | |
| 1 | शरीररचनाशास्त्र | राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या नियमानुसार. | 1 |
| 2 | शरीरक्रियाशास्त्र | | 1 |
| 3 | जीवरसायनशास्त्र | | 1 |
| 4 | शरीरविकृतीशास्त्र | | 1 |
| 5 | न्यायवैद्यकशास्त्र | | 1 |
| 6 | जन औषधवैद्यकशास्त्र | | 1 |
| 7 | औषधवैद्यकशास्त्र | | 1 |
| 8 | शल्यचिकित्साशास्त्र | | 1 |
| 9 | कान नाक घास शास्त्र | | 1 |
| 10 | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | | 1 |
| 11 | स्त्रीरोग प्रसूतीशास्त्र | | 1 |
| 12 | बधिरीकरणशास्त्र | | 1 |
| 13 | क्ष-किरणशास्त्र | | 1 |
| 14 | औषधशास्त्र | | 1 |
| 15 | सूक्ष्मजीवशास्त्र | | 1 |
| 16 | बालरोग चिकित्साशास्त्र | | 1 |
| 17 | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | | 1 |
| | | **एकूण** | **17** |

**(डॉ. संतोष जी. वर्मा)**
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अंबरनाथ, जि. ठाणे.

| अ.क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| | | **सहयोगी प्राध्यापक** | |
| 1 | शरीररचनाशास्त्र | राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या नियमानुसार. | 1 |
| 2 | शरीरक्रियाशास्त्र | | 1 |
| 3 | जीवरसायनशास्त्र | | 1 |
| 4 | शरीरविकृतीशास्त्र | | 2 |
| 5 | न्यायवैद्यकशास्त्र | | 1 |
| 6 | जन औषधवैद्यकशास्त्र | | 2 |
| 7 | औषधवैद्यकशास्त्र | | 3 |
| 8 | शल्यचिकित्साशास्त्र | | 3 |
| 9 | कान नाक घास शास्त्र | | 1 |
| 10 | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | | 1 |
| 11 | स्त्रीरोग प्रसूतीशास्त्र | | 1 |
| 12 | बधिरीकरणशास्त्र | | 2 |
| 13 | क्ष-किरणशास्त्र | | 1 |
| 14 | दंतशास्त्र | | 1 |
| 15 | औषधशास्त्र | | 1 |
| 16 | सूक्ष्मजीवशास्त्र | | 1 |
| 17 | बालरोग चिकित्साशास्त्र | | 1 |
| 18 | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | | 1 |
| 19 | मनोविकृतीशास्त्र | | 1 |
| 20 | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | | 1 |
| | | **एकूण** | **27** |

**(डॉ. संतोष जी. वर्मा)**
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अंबरनाथ, जि. ठाणे